म. ग्रं. सं. ठाणें

| विषय | लेखक परशुराम पंत गोडबोले | सन |
| --- | --- | --- |
| संग्रहालय क्रमांक | पुस्तकाचें नांव वृत्तदर्पण | |

११

# वृत्तदर्पण

(भा. व्या)

१८९०
म. ग्रं. सं. ठाणें
भाषा-व्याकरण
२५.

॥ आलोड्यसर्वशास्त्राणि विचार्यचपुन्हपुन्हा:॥
॥ इदमेकंसुनिष्पन्नंध्येयोनारायणसदा॥१॥

# वृत्तदर्पण.

# वृत्तदर्पण.

परशुरामपंत गोडबोले
ह्यांनीं केलें.

तें

बाळकृष्ण रामचंद्र शास्त्री ठकार ह्यांच्या छापखान्यांत
छापिलें.

मुक्काम पुणें.

शके १७८२

इसवी सन १८६०

इसवी सन १८४७ च्या विसाव्या आक्ता प्रमाणें ग्रंथ
कर्त्यानें ह्या ग्रंथावर आपली मालकी ठेविली
आहे.

किंमत चार आणे.

# उपोद्घात.

## श्लोक.

नमूनि देव देवातें रसिक स्वांत तर्पण ॥
बाल बोधार्थ करितों अल्प हें वृत्त दर्पण ॥ १ ॥
छंदें वृत्तें संस्कृतांत वर्णिलीं असतीं मुळीं ॥
पाहून त्याच रीतीनें देशी भाषेंत सांगतों ॥ २ ॥

कविता दोन प्रकारची आहे. एक गद्य रूप आणि एक पद्य रूप. ज्याला पाद नाहींत तें गद्य, आणि ज्याला पाद आहेत तें पद्य. त्या पद्यालाच श्लोक, छंद, वृत्त असें म्हणतात. पद्यरचने विषयीं संस्कृत भाषेंत पिंगलादिकांनीं नियम सांगितले आहेत, ते प्राकृत जनास समजण्या करितां त्याच नियमांच्या आधारानें वृत्तांचीं लक्ष्य लक्षणें देश भाषेंत पद्य रूपानें सांगतों.

## गीति.

छंदः शास्त्रीं जितकीं छंदें वृत्तें हि वर्णिलीं असती ॥
तितकीं प्राकृत भाषे मध्यें कोणीं हि घेतलीं नसती ॥ ३ ॥
प्राकृत कविनीं जींजीं वृत्तें पाहोनि घेतलीं गोडीं ॥
तीं तींच वर्णितों मी येतिल बहुतेक राहतिल थोडीं ॥ ४ ॥

संस्कृत भाषेंत वृत्तांचे प्रकार बहुत आहेत, म्हणजे एक अक्षराचा पाद, दोन अक्षरांचा पाद, तीन अक्षरांचा पाद असे चढत चढत सवीस अक्षरांचा पाद पर्यंत छंदें सांगितलीं आहेत. परंतु प्राकृत भाषेंत तितके प्रकार प्रसिद्ध नाहींत.

---

१ रसिक जनाच्या हृदयास तृप्त करणारें २ महाराष्ट्र भाषेंत.

एका अक्षरा पासून सात अक्षरां पर्यंत पादांचीं वृत्तें येथें घेतलीं नाहींत. आठ अक्षरांच्या चरणा पासून तेवीस अक्षरांच्या चरणा पर्यंत वृत्तें घेतलीं आहेत.

## गीति.

जी नियत अक्षरांची रचना तिस म्हणति वृत्त कीं छंद॥
अक्षर गण भेदांनीं होती त्यांचे अनेक विध भेद॥ ५॥

चरणाचीं अक्षरें सारखीं असून गणभेदांनीं अवांतर भेद पुष्कळ होतात. त्यांतून प्रसिद्ध वृत्तें तीं घेतलीं आहेत.

हा ग्रंथ निर्दोष होईल असें म्हणवत नाहीं. कोठें कोठें-दोष राहतील, तथापि नवीन प्रकारा कडे लक्ष्य देऊन विद्वानांनीं क्षमा करावीं.

## गीति.

कविता असो कशीतरि तात्पर्यावरिच सज्जनीं दृष्टी॥
द्यावी तेणें होवो बालोक्तें तेंवि तन्मनस्तुष्टी॥ ६॥

---

## परिभाषा.

गण दोन प्रकारचे आहेत. अक्षर गण आणि मात्रा गण.

## अक्षरगण.

### दिंडी

गणा मध्यें अक्षरें तीन येती॥ ह्रस्व दीर्घांनीं आठ भेद होती॥
यर तन भज सम हि अशीं आठ नामें॥ फोड त्यांची सांगतों क्रमानें॥ ७

## गण लक्षण.

आद्य लघू तो यगण म्हणावा ॥
मध्य लघू तो रगण गणावा ॥
अंत्य लघू तो तगण म्हणावा ॥
सर्व लघू तो नगण गणावा ॥८॥
आद्य गुरू तो भगण म्हणावा ॥
मध्य गुरू तो जगण गणावा ॥
अंत्य गुरू तो सगण म्हणावा ॥
सर्व गुरू तो मगण गणावा ॥९॥

## उदाहरण श्लोक.

य, यमाचा, न, नमन, ताराप, त, र, राधिका ॥
म, मानावा, स, समरा, ज, जनास, भ, भास्कर ॥

ह्या श्लोकांत छंदोनुरोधानें गणांचा क्रम साधला-नाहीं म्हणून क्रमानें गण लिहिलों.

यमाचा, हा यगण आद्य लघु ॥
राधिका, हा रगण मध्य लघु ॥
ताराप, हा तगण अंत्य लघु ॥
नमन, हा नगण सर्व लघु ॥
भास्कर, हा भगण आद्य गुरु ॥
जनास, हा जगण मध्य गुरु ॥
समरा. हा सगण अंत्य गुरु ॥
मानावा हा मगण सर्वगुरु ॥

मा... ३१

## लघु गुरु संज्ञा.

### श्लोक.

ऱ्हस्व स्वरातें लघु बोलताती ॥
दीर्घ स्वरातें गुरु नाम देती ॥
पुढें अनुस्वार विसर्ग येतो ॥
संयोग ऱ्हस्वास गुरुत्व देतो ॥ ११ ॥

हा नियम प्रायः संस्कृत शब्दांस लागू आहे. जसें कंक, दुःख, पर्व, पत्र, इत्यादि. ह्यांतील पहिलीं ऱ्हस्व अक्षरें गुरु समजावीं. परंतु प्राकृत शब्दांत तसें मानीत नाहींत. जंव तंव तुम्ही, तुझ्या, तिच्या, दुसऱ्या, इत्यादि. ह्यांतील पहिल्या ऱ्हस्वाक्षराला गुरुत्व नाहीं. दोन समान व्यंजनें पुढें असलीं तर मात्र ऱ्हस्वास गुरुत्व येतें. जसें, किल्ला, थट्टा, गप्पा, कुड्डा, इत्यादि.

## मात्रा लक्षण.

मात्रा म्हणजे अक्षराच्या उच्चारण काळाचें प्रमाण.

### श्लोक.

लघूची तो एक मात्रा गुरूच्या दोन मानिती ॥
मात्रा वृत्तीं याच रीती मात्रांनीं गण योजिती ॥ १२ ॥

## मात्रा गण.

### आर्या.

गण एक एक होतो मात्रांचा चार चार मात्रांनीं ॥
लघुगुरु भेदांनीं ते मात्रांचे पांच गण होती. ॥ १३ ॥

## मात्रा गण लक्षण.

## आर्या.

द्विगुरु मगण, ललग सगण, लगल जगण, गलल भगण, मनिं आणा॥

चारहि लघु तो चि नगण, ऐसे हे पांच गण जाणा॥

## उदाहरणें.

वेधा हा मगण. ह्यांत दोन गुरु आहेत.

परवा हा सगण. ह्यांत दोन लघु एक गुरु.

कलाप हा जगण. ह्यांत लघु गुरु लघु.

वासर हा भगण. ह्यांत गुरु लघु लघु.

पथकर हा नगण. ह्यांत चारही लघु आहेत.

चार मात्रांचा गण भरावयास ह्या पांचां वांचून कोणताही गण येऊं शकत नाहीं.

## वृत्तांचें आणखी तीन भेद.

समवृत्तें, अर्धसमवृत्तें, आणि विषमवृत्तें, वृत्ताला प्रायः चार भाग असतात. प्रत्येक भागाला चरण किंवा पाद म्हणतात. ज्या वृत्ताचे चाही चरण सारखे तें समवृत्त, ज्याचे प्रथम तृतीय आणि द्वितीय चतुर्थ चरण सारखे तें अर्धसमवृत्त, आणि ज्याचे चान्ही चरण भिन्न लक्षणांचे तें विषमवृत्त. प्राकृत भाषेंत विषमवृत्त कोठें आढकत नाहीं. अर्धसमवृत्तें तरी क्वचित्. समवृत्तें मात्र फार आहेत.

## श्लोक.

वृत्ताचा जो चतुर्थांश तयाला पाद बोलिजे॥

पादाच्या लक्षणें सर्व वृत्तलक्षण जाणिजे॥ १५

हा नियम केवळ सम वृत्तास लागतो.[1]

वृत्तें पुष्कळ आहेत, त्यांत कोणतें वृत्त कोणत्या रसाला अनुकूळ, व कोणतें वृत्त कोणत्या रसाला प्रतिकूळ ह्या विषयीं ही नियम आहेत, परंतु त्याचा विचार येथें केला नाहीं.

## ह्या ग्रंथातील विशेष संकेत.

### श्लोक.

पादार्थी पदही कोठें गणार्थीं संग घेतला ॥
अक्षरार्थीं अवयव लला लघु गगा गुरु ॥
अक्षरें गण संज्ञेचीं जरि आहेत न्हस्वतीं ॥
छंदाच्या अनुरोधानें कोठें दीर्घ हि घातलीं ॥ १६ ॥

### गीति.

ज्या वृत्ताचें लक्षण तें त्या वृत्तींच कथिन मी स्पष्ट ॥
वास्तव होइल कोठें क्लिष्ट परी साह तील तें शिष्ट ॥ १७ ॥

### श्लोक.

वृत्तसंज्ञा आद्य पादीं द्वितीं यांत गणक्रम ॥
अक्षरें तिसऱ्या पादीं उदाहरण शेवटीं ॥ १८ ॥

येथें लक्षण श्लोकाचा चतुर्थ चरण जरी उदाहरणार्थ केला आहे तरी पूर्ण पणें समजण्या साठीं प्रत्येक वृत्तास अन्य ग्रंथांतील एकेक उदाहरण निराळें दाखविलें आहे. क्वचित् अन्य कवींचें उदाहरण न मिळालें तेथें स्वकृत उदाहरण दाखविलें आहे.

---

[1] हा नियम तरी समवृत्ता विषयीं मात्र साधेल.

यती किंवा अवसान कोणत्या अक्षरावर असावें हें समजण्या करितां त्या त्या वृत्ताच्या नांवापुढें अंक घातले आहेत आणि ज्याला पादांतीं यती आहे त्यापुढें पा. असें अक्षर घातलें आहे.

ह्या लहान शा ग्रंथाचा जे कोणी मन लावून अभ्यास करतील त्यांस वृत्तां विषयीं थोडक्यांत बरीच माहितगारी होईल. किंबहुना पद्यरूप नवी कविता शुद्ध रीतीनें करतां येईल.

ह्या ग्रंथांत पुढें जीं वृत्तें सांगावयाचीं आहेत त्यांचीं नांवें अनुक्रमानें सांगतों.

## वृत्तांचीं नांवें.


| | | | |
|---|---|---|---|
| १ विद्युन्माला. | ८ | १२ ललित. | ११ |
| २ माणवक. | ८ | १३ इंद्रवज्रा. | ११ |
| ३ प्रमाणिका. | ८ | १४ उपेंद्रवज्रा. | ११ |
| ४ समानिका. | ८ | १५ उपजाति. | ११ |
| ५ अनुष्टुप. | ८ | १६ शालिनी. | ११ |
| ६ मणिबंध. | ९ | १७ दोधक. | ११ |
| ७ चंपकमाला. | १० | १८ रथोद्धता. | ११ |
| ८ हंसी. | १० | १९ स्वागता. | ११ |
| ९ मत्ता. | १० | २० मौक्तिकमाला. | ११ |
| १० कामदा. | १० | २१ भ्रमरविलसित. | ११ |
| ११ शुद्धकामदा. | ११ | २२ भद्रिका. | ११ |

२३ भुजंगप्रयात. १२
२४ द्रुतविलंबित. १२
२५ प्रियंवदा. १२
२६ वंशस्थ. १२
२७ इंद्रवंशा. १२
२८ तोटक. १२
२९ जलोद्धतगति. १२
३० स्त्रग्विणी. १२
३१ प्रमिताक्षरा. १२
३२ वैश्वदेवी. १२
३३ मालती. १२
३४ यूथिका. १२
३५ प्रभावती. १३
३६ मंजुभाषिणी. १३
३७ प्रहर्षणी. १३
३८ मत्तमयूरी. १३
३९ विभावरी. १३
४० वसंततिलका. १४
४१ प्रहरणकलिता. १४
४२ असंबाधा. १४
४३ मध्यक्षामा. १४
४४ मालिनी. १५
४५ चामर. १५
४६ पंचचामर. १६
४७ शिखरिणी. १७
४८ पृथ्वी. १७
४९ हरिणी. १७
५० मंदाक्रांता. १७
५१ विबुधप्रिया. १८
५२ शार्दूलविक्रीडित. १९
५३ स्त्रग्धरा. २१
५४ अमृतध्वनि. २२
५५ मंदारमाला. २२
५६ उमा. २२
५७ मदिरा. २३
५८ मदिरा किंवा सवाई. २३
५९ दुसरी सवाई. २३
६० हरिणीप्लुता.
६१ माल्यभारा.
६२ पुष्पिताग्रा.
६३ आर्या.
६४ गीति.
६५ उपगीति.
६६ उद्गीति.
६७ आर्यागीति.
६८ अभंग.
६९ दिंडी.
७० साकी.
७१ ओंवी.
७२ घनाक्षरी.

## समवृत्तें.

### १ विद्युन्माला. यति. ४, ४,

विद्युन्माला ऐसें बोला ॥ जेथें मामा गागा आला ॥
आठांनीं या पादें व्हावें ॥ श्रीरामातें भावें ध्यावें ॥

चरणांत अक्षरें ८ गण. म.म. ग. ग.

### उदाहरण बाहेरचें नवनीत.

दीनप्रेमा येऊं रामा ॥ सोख्यारामा हृद्विश्रामा ॥
अंतः सप्मानष्टक्षुप्मा ॥ संपद्धामा दे मत्कामा ॥

### २ माणवक. य. पा०

माणवक स्पष्ट म्हणा ॥ भातलगा हेच गणा ॥
अक्षरकें अष्ट मितें ॥ बालक तें दुग्ध पितें ॥

चरणांत अक्षरें ८ गण. भ. त. ल. ग.

### उदाहरण बा० नवनीत.

नित्य नव्हे त्याकरितां ॥ कांझटतां कां श्रमतां ॥
जा भगवन्नाम वदा ॥ निर्भय गा त्यास सदा ॥

### ३ प्रमाणिका. पा०

प्रमाणिका तिला म्हणा ॥ जराल गा असें गणा ॥
पदांत आठ अक्षरें ॥ वदाल सत्य तें बरें ॥

चरणांत अक्षरें ८ गण. ज. र. ल. ग.

### उदाहरण. बा० नवनीत.

अशाश्वतासि वंदितां ॥ वशाश्वतासि निंदितां ॥
असे स्वतांच वागतां ॥ म्हणूनि ताप भोगितां ॥

---

१ हिला नगस्वरूपिणी असें ही नांव आहे.

४ समानिका. पा०

ती समानिका घडेल ॥ राजगाल ज्या जडेल ॥
पादिं आठ अक्षरेंच ॥ सांगतों तुम्हां खरेंच ॥

चरणांत अक्षरें ८ गण. र. ज. ल. ग.

उदाहरण. दुसरें स्वकृत.

तूमच्या मि दास सत्य ॥ जें कराल पारपत्य ॥
मान्य तें करवास घाल ॥ योग्य तें तुम्ही कराल ॥

५ अनुष्टुप्. पा०

अनुष्टुप् छंद तें ज्याला ॥ एक नेम नसे गणीं ॥
अक्षरें चरणीं आठ ॥ देवा तार मला लवें ॥

चरणांत अक्षरें ८ गणाचा नियम नाहीं.

उदाहरण. बा० मोरोपंत.

सेवा करा वया त्याचा ॥ देवा हा योग्य चाकर ॥
या तस्याच्या शिरीं आत ॥ पत्र हो तुमचा कर ॥

६ मणिबंध. पा०

त्या मणिबंधा[1] तें धरिती ॥ भामसयत्वादा वरिती ॥
अक्षरसंख्या यास नऊ ॥ सन्मन लोण्याहून मऊ ॥

चरणांत अक्षरें ९ गण. भ. म. स.

उदाहरण. वा० नव०

द्रव्य मिळावें याकारितां ॥ कां हलक्यां ना आर्जवतां ॥
काय नव्हे हो तो धनवान् ॥ ईश रमेचा जो भगवान् ॥

---

[1] या वृत्ताला मणिमध्य असेंही नांव आहे.

## ७ चंपकमाला. य. ५।५

चंपक माला तीस म्हणावें ॥ भामस गानें जेथ गणावें ॥
पांच[1] दुणी पादाक्षर संख्या ॥ शीघ्र धरावें सज्जन सख्या ॥
चरणांत अक्षरें १० गण. भ. म. स. ग.

### उदाहरण. बा० नव०

धांव मुकुंदा दुष्ट विमर्दा ॥ धांव रमेशा दुःख विनाशा ॥
फार विपत्ती फारच भीती ॥ यांस हरावें सत्वर यावें ॥

## ८ हंसी. य० ४, ६

हंसी ऐसें म्हणतिल तिथे ॥ येती पादीं मभनग जिथे ॥
एक्या पादीं अवयव दाहा ॥ मुक्ती मध्यें चिर सुखपहा ॥
चरणांत अक्षरें १० गण. म. भ. न. ग.

### उदाहरण. बा० नव.

या संसारीं चलच सगळें ॥ आप्तस्नेही तनु धन बळें ॥
विश्व स्वप्या विरहित खरें ॥ विश्वासाचें स्थळ न दुसरें ॥

## ९ मत्ता. य० ४, ६

मत्ता ऐसें म्हणतिल तीतें ॥ येती पादीं मभस गजीतें ॥
एक्या पादीं अवयव दाहा ॥ विद्याभ्यासीं अविरत राहा ॥
चरणांत अक्षरें १० गण. म. भ. स. ग.

### उदाहरण. दु० स्वकृत.

होते जेव्हां सुसमय वृष्टी ॥ पावे तेव्हां सुख बहु सृष्टी ॥
चिंता आहे बहु तचि देवा ॥ त्याची आम्ही करुं बहु सेवा ॥

---

[1] पांच दुणी दहा अक्षरें.

## १० कामदा. य० ५,५

बोलती कवी नाम कामदा॥ रायजागहे येति ज्या पदा॥
अक्षरें तिथें मोजितां दहा॥ भो दया निधे वारिंता पहा॥

चरणांत अक्षरें १० गण. र.य.ज.ग.

उदाहरण. बा० गोसावीनंदन.

घोर हा नको फार कष्ट लों॥ त्वाहि ला समीव्यर्थ गुंतलों॥
वारिं शीघ्र संसारयातना॥ हे दया निधेश्री गजानना॥

## ११ शुद्धकामदा. य० ६,५

म्हणति तीसवा शुद्धकामदा॥ नररजागहे येति ज्या पदा॥
चरणिं येति एकादशा क्षरें॥ नृपतिमस्तकीं छत्र चामरें॥

चरणांत अक्षरें ११ गण. न.र.र.ल.ग.

उदाहरण. बा० वामन.

प्रगटला सि तूं नंदगोकुळीं॥ म्हणुनि इंदिरा वास या स्थळीं॥
सकळ ही सुखी या व्रजीं हरी॥ विरह दुःखिना गोपसुंदरी॥

## १२ ललित. य० ५,६

त्यास ही कवी ललित बोलती॥ राजसा लगा चरणिं दीसती॥
पांच आणिसा असति अक्षरें॥ साधु बोलती वचन में खरें॥

चरणांत अक्षरें ११ गण. र.ज.स.ल.ग.

उदाहरण. दुस० स्वकृत.

संपदा असे बहुत ज्याघरीं॥ खाव या तिथे मिळति सोयरीं॥
द्रव्य संपतां पळति तेथुनी॥ कोणि पाहिना जवळ येउनी॥

## १३ इंद्रवज्रा. पा०

ती इंद्रवज्रा म्हणि जे कवीनें॥ येतीत ता जागगहे क्रमानें॥
या अक्षरें येतिल पादिं अर्क्का॥ मारी अरी जो धरि शंखचक्रा॥

चरणांत अक्षरें ११ गण. त. त. ज. ग. ग.

### उदाहरण. दु० वेणीसंहार०

कां टाकिलें शस्त्र रणांत तेणें॥ साक्षी पृथासूनु च एक जाणें॥
हें कर्म झालें समरांत जेव्हां॥ होतासि कोठें रण भीरु तेव्हां॥

## १४ उपेंद्रवज्रा. पा०

उपेंद्रवज्रा म्हणतात तीला॥ जताज गागा गण येति जीला॥
पदास होणें शिव अक्षरांनीं॥ पहा मनीं धुंडि शिका यरानीं॥

चरणांत अक्षरें ११ गण. ज. त. ज. ग. ग.

### उदाहरण. बा० रघुनाथ पं०

तपावनीं एक तटाक तोयें॥ तुडुंबलें तामरसा न पायें॥
निरंतरा मंद मरंद वाहे॥ तपांत ही यास्तव रिक्त नोहे॥

## १५ उपजाति. पा०

एक्या पदीं येइल इंद्रवज्रा॥ दुज्या पदीं तीच उपेंद्रवज्रा॥
तेव्हां म्हणावें उपजाति तीला॥ पतीच दैवत्य असे सतीला॥

चरणांत अक्षरें ११ गण. समपादीं ज. त. ज. ग. ग. आणि विषम पादीं त. त. ज. ग. ग.

### उदाहरण. बा० नवनी०

हा बाण गेला वरती मण्याला॥ धरून पृथ्वीवर आणण्याला॥
त्याणेंच आला परतून पक्षी॥ पहा कसा निश्चल रत्न भक्षी॥

## १६ शालिनी. य० ४, ७.

त्या वृत्ताला शालिनी हेंचनाम॥ जें माता तागाग यांचें स्वधाम॥
एक्या पादीं अक्षरें सात चार॥ स्वो द्धाराचा वाकरा वाविचार॥

चरणांत अक्षरें ११ गण. म. त. त. ग. ग.

### उदाहरण. वा० नवनीत.

मीं आत्मा हृत् इंद्रियें देह वाणी॥ बुद्धी वांछा कल्पना वृत्ति यांणीं॥
जीं जीं केलीं ज्ञात अज्ञान पापें॥ तीं नाशावीं श्रीहरि स्वप्रतापें॥

## १७ दोधक. पा०

दोधक नांव तयासचि देती॥ तीन भ दोन ग हे गण येती॥
अक्षर मान शिवासम जाणा॥ सत्वर भेटविं तो यदु राणा॥

चरणांत अक्षरें ११ गण. भ. भ. भ. ग. ग.

### उदाहरण. वा० नवनीत.

सज्जन पालन पोषण कर्ता॥ सत्वर सर्वहि संकट हर्ता॥
तीन खळांस भयंकर शास्ता॥ कृत्यनुरूप हरी फल दाता॥

## १८ रथोद्धता. ऋ० पा०

वृत्त तेंच म्हणती रथोद्धता॥ रान रा लग असेच तत्वता॥
रुद्र संमित पदांत अक्षरें॥ शास्त्रतत्व समजा मनीं खरें॥

चरणांत अक्षरें ११ गण. र. न. र. ल. ग.

### उदाहरण. वा० वामन पं०

मोकळा करुनि कंठ ते धवा॥ आठवूनि मनिं जानकी धवा॥
ते रडे भरत ही तसा रडे॥ जों वरी नयन होति कोरडे॥

---

१ अकरा. २ अकरा.

## १९ स्वागता. य० पा०

स्वागता म्हणति सुज्ञ तयाला ॥ रानभा गगअसे गण ज्याला ॥
अक्षरें हि अकरा पदिं येती ॥ धन्य ते हरिपदीं मन देती ॥

चरणांत अक्षरें ११ गण. र. न. भ. ग. ग.

### उदाहरण. वा० वामनपं०

देखिलें नयनिं नंदकुमारा ॥ श्याम सुंदर वरा सुकुमारा ॥
मंद हास्य अतिरम्य मुखाचें ॥ दाखवी स्वमुख नित्य सुखाचें ॥

## २० मौक्तिकमाला. य० ५, ६

मौक्तिक माला म्हणति तयाला ॥ येति भाना नगग जयाला ॥
अक्षर संख्या शिव सम पादीं ॥ लुब्ध चि होती मृगमधु नादीं ॥

चरणांत अक्षरें ११ गण. भ. त. न. ग. ग.

### उदाहरण. वा० स्वकृत.

बोलति सारे पढ़त चि त्याला ॥ अक्षर नाहीं किमपि जयाला ॥
साक्षरता उत्तम पद देते ॥ व्यक्षरता सघनाधन नेते ॥

## २१ भ्रमरविलसित. ४, ७

त्याचीं नावे भ्रमर विलसितें ॥ ज्यांच्या पादीं मभनलग मितें ॥
एके पादीं अवयव अकरा ॥ घ्यावा धर्मो उशिर न च करा ॥

चरणांत अक्षरें ११ गण. म. भ. न. ल. ग.

### उदाहरण. वा० स्वकृत.

मुद्रा शोभे सुकनक घटिता ॥ कंठीं माला मणिगण खचिता ॥
माथां शोभे सुमन असितें ॥ अंगा लावी मृगमद उसतें ॥

---

१ अकरा. २ अक्षरें.

## २२ भद्रिका. पा०

म्हणति बुधतिलास भद्रिका॥ न न र ल ग असीच मुद्रिका॥
हरमित पदिं अक्षरें गणा॥ सतत हरि हरी मुखें म्हणा॥

चरणांत अक्षरें ११ गण न. न. र. ल. ग.

### उदाहरण. रामचंद्र जोशी.

यदुपति पदिं या मना सरे॥ परितर भववासना सरे॥
मिळतिल तुज फार मुद्रिका॥ वसतल चारिं सदैव भद्रिका॥

## २३ भुजंगप्रयात. य. ६.६

भुजंग प्रयातें म्हणावें तयाला॥ क्रमानेंच येती य चारी जयाला॥
पदिं ज्यांचिया अक्षरें येति बारा॥ रमानायका दुःख माझें निवारा॥

चरणांत अक्षरें १२ गण. य. य. य. य.

### उदाहरण. श्री० रामदास.

मना सज्जना भक्तिपंथें चि जावें॥ तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें॥
जनीं निंद्य तें सर्व सोडोनि द्यावें॥ जगीं वंद्य तें सर्वभावें करावें॥

## २४ द्रुतविलंबित. पा०

द्रुत विलंबित वृत्त घडे तिथें॥ न भ भ र क्रम ह्याच गणीं जिथें॥
रविमितें चरणांतिल अक्षरें॥ त्वरित धर्म करा अपुल्या करें॥

चरणांत अक्षरें १२ गण. न. भ. भ. र.

### उदाहरण. वा० वामन पं०

क्षण भरी जरि देह न सूटता॥ तरतदां स्थळिं हे स्थळिं तूटता॥
बक असें कळलें खळसत्तमा॥ द्रुतनिलक्षित मे पुरुषोत्तमा॥

---

१ अकरा.

## २५ प्रियंवदा. प० ५, ७

कविभले म्हणति तीप्रियं वदा ॥ नभज रा गण असे जिच्या पदा ॥
चरणिं चीं असति अक्षरें रवी ॥ न करितो अनय जो असे कवी ॥

चरणांत अक्षरें १२ गण. न. भ. ज. र.

### उदाहरण. दु० स्व कृत.

मुनिजनीं मदन सादि से सये ॥ भजगमेवर तुस्या मनामये ॥
जन फजेस रिसवूनि यांनदा ॥ वदतसे निज सखी प्रियंवदा ॥

## २६ वंशस्थ. पा०

तयास वंशस्थनि नाम ठेविती ॥ जयासआलाजर संघ सेविती ॥
पदांत मासां इतकींच अक्षरें ॥ पहातपासूनि असत्य कींखरें ॥

चरणांत अक्षरें १२ गण. ज. त. ज. र.

### उदाहरण. बा० रघुनाथ पंडि०

लते तळीं रुंद निरुंद कालवे ॥ गळोनि तेथें मकरंद कालवे ॥
परागही सांद्र तयांत रंगती ॥ फुलांसवें भृंग नती तरंगती ॥

## २७ इंद्रवंशा. पा०

ती इंद्रवंशा कविराज हे रिती ॥ ताता जराहे गण येति ये रिती ॥
पादांमधें भानुमितेंच अक्षरे ॥ नाहीं प्रपंचांतिल सौख्यतें खरें ॥

चरणांत अक्षरें १२ गण. त. त. ज. र.

### उदाहरण. बा० रामचंद्रजो०

गोपी हरीच्या भजनांत रंगल्या ॥ तें पाहुनी देवि मनांत भंगल्या ॥
हें सौख्य आम्हां भजनांत पातल्या ॥ कीं इंद्रवंशांत हि जन्म घेतल्या ॥

## २८ तोटक. पा०

वदती कवि तोटक वृत्त तया ॥ चरणीं सचतुष्टय येत जया ॥
द्वा आणिक दोन पदाक्षर तीं ॥ दट हीं असतीं तरिकां क्षरतीं ॥

चरणांत अक्षरें १२ गण. स. स. स. स.

### उदाहरण. बा० नवनी०

जर विस्तृत नेत्र अशी असली ॥ हरिणी तुजला दिसली असली ॥
तर मानव रूपवती हरिणी ॥ चलसत्वर शरिवव ती रमणी ॥

## २९ जलोद्धत गति. ६,६

जलोद्धत गती तिलाच म्हणती ॥ जिथें गण जसा जसाच घडती ॥
पदीं असति अक्षरें रवि मिती ॥ अनंत सुखनें मुखें वदु किती ॥

चरणांत अक्षरें १२ गण. ज. स. ज. स.

### उदाहरण. बा० रामचंद्रजो०

जनाचि सखिलाज ही विसरली ॥ पतिव्रतपणां तुनी घसरली ॥
नसे नवल ऐकतां च्चि मुरली ॥ मनी निज मधें समग्र मुरली ॥

## ३० स्रग्विणी. पा०

स्रग्विणी वृत्त हें नांव देती तया ॥ पादिं येती रहे संघ चारी जया ॥
होति बारा पदीं अक्षरें मोजितां ॥ सौख्य होतें मनां ऐश्वरीं योजितां ॥

चरणांत अक्षरें १२ गण. र. र. र. र.

### उदाहरण. बा० राम० जो०

राधिका रात्रिं दारीं उभी राहिली ॥ श्री धरानें शरत्कालिं ती पाहिली ॥
पूर्णचंद्रानना ध्वांत विद्राविणी ॥ पूर्ण मासीच मुक्ताफळ स्रग्विणी ॥

## ३१ प्रमिता क्षरा. पा०

प्रमिता क्षरा म्हणति तीस कवी ॥ पद साजसा सगण हे वदवी ॥
पदिं अक्षरें रवि मितें असती ॥ पनि वांछुनी सुख गणी नसती ॥

चरणांत अक्षरें १२ गण. स. ज. स. स.

### उदाहरण. दु० स्वकृत.

सकला जनास सुखदा सरसा ॥ रवि भाजशी उदयिं नामरसा ॥
गुरु वा करील न्हि भवाब्धि रिता ॥ हरिपादजा जशि सिता सरिता ॥

## ३२ वैश्वदेवी. य० ५, ७

त्या त्या वृत्ता ला बोलती वैश्वदेवी ॥ ज्या ज्या पादीं हे दोन दां मायठेवी ॥
एकेका पादीं अक्षरें येति बारा ॥ मिथ्या माना या का प्रपंची पसारा ॥

चरणांत अक्षरें १२ गण. म. म. य. य.

### उदाहरण. बा० नच नी०

याजन्मा मध्यें इंद्रियें हे [illegible]

जींजीं मीं केलीं ज्ञात अज्ञात पापें ॥ तींतीं नाशावीं श्रीहरि स्वप्रतापें ॥

## ३३ मालती. य० ५, ७

कविजन बोलति तीस मालती ॥ नजजर हे गण जीस लागती ॥
भरतिल पादिं दशद्वयाक्षरें ॥ त्वरित करा अपुलें तुम्ही बरें ॥

चरणांत अक्षरें १२ गण. न. ज. ज. र.

### उदाहरण. बा० राम. जो०

निशि सुजना निजला बरी पहा ॥ नयन सुखावह रत्न हें महा ॥
नगमणि घालुनियां दिसे कशी ॥ कनकलता नवि मालती जशी ॥

३४ यूथिका. य० ३, ९

यूथिका म्हणति वृत्त कवी तया ॥
शान भार गण येतिल हे जया ॥
अक्षरें हि चरणांत दशा द्वयें ॥
व्यर्थ घालवुं नका अपुलीं वयें ॥

चरणांत अक्षरें १२ गण. र. न. भ. र.

उदाहरण. बा० अनंत कवी.

दीर्घ रोदन वनीं लङ्कु आयके ॥
कोण गांजित असे मम अंबिके ॥
बाण तीक्ष्ण सशितीं धनुषींकरी ॥
येउनी नमुनि बोलत सुंदरी ॥

३५ प्रभावती. ४, ९

प्रभावती म्हणति सुवृत्तनें गुरू ॥
जयापदीं जभज स शेवटीं गुरू ॥
पदामधें त्रिदश चि येति अक्षरें ॥
दयानिधी करिलचि आमुचें बरें ॥

चरणांत अक्षरें १३ गण. ज. भ. ज. स. ग.

उदाहरण. बा० नवनीत.

चरा चरा प्रति उदयास आणितो ॥
जगत्पती अखिल हि हार्द जाणतो ॥
दयानिधी सकळ विपत्ति वारितो ॥
समर्थ तो शरण जनास तारितो ॥

३६ मंजुभाषिणी. य० ५, ८

म्हणती कवी तिस न्वि मंजुभाषिणी ॥
चरणीं जिच्या सजस जाग दाटणी ॥
भरती पदीं त्रिदश संख्य अक्षरें ॥
ठ सया मनीं सद्रुप देश आदरें ॥

चरणांत अक्षरें १३ गण. स. ज. स. ज. ग.

उदाहरण. बा० राम० जो०

हरिपांतुनी घडिभरी घरीं नसे ॥
भुलली तया सतत काय मानसें ॥
परपूरुषीं रति धरी स्वतोषिणी ॥
म्हणतां कशी गरिब मंजुभाषिणी ॥

३७ प्रहर्षिणी. य० ३, १०

वृत्तातें म्हणति कवि प्रहर्षिणी त्या ॥
आरंभीं मनजर शेवटीं गये ज्या ॥
एकेका चरणिं सदक्षरें द्विनेरा ॥
देवाचें चरित कसें विचित्र हेरा ॥

चरणांत अक्षरें १३ गण. म. न. ज. र. ग.

उदाहरण. बा० नवनीत.

अंगानें सरल तसाच तो मनानें ॥
कालानें चल न तसाच तो धनानें ॥
विद्येनें सरस तसाच तो मतीनें ॥
उक्तीनें चतुर तसाच तो कृतीनें ॥

३८ मत्तमयूरी. य० ४, ९

साधूत्ताला बोलतिते मत्त मयूरी ॥
जेथें येती मात य सागा गणपूरी ॥
पादीं पादीं अक्षर संख्या समतेरा ॥
श्रीरामाच्या पाद सरोजीं सुखहेरा ॥

चरणांत अक्षरें १३ गण. म. त. य. स. ग.

उदाहरण. बा० राम० जो०

माता भ्राता त्वं भय नाशा सरथयाजी ॥
गेले स्नाना विप्रतया अन्न नभाजी ॥
आतां देती शाप सह्या सीवनिं कृष्णा ॥
हाका मारी मत्तमयूरी परि कृष्णा ॥

३९ विभावरी. पा०

वदतिते कथितया स विभावरी ॥
नभजजा गगण ज्या चरणावरी ॥
त्रिदश जाण चरणांतिल अक्षरें ॥
गुरुवचें करितजा अति आदरें ॥

चरणांत अक्षरें १३ गण. न. भ. ज. ज. ग.

उदाहरण. बा० अनंत क०

रुदन ते करितसे जगका त्मजा ॥
कुमति हे उपजली कशि आत्मजा ॥
तुरग बांधुनि शिवावरि कठला ॥
पडतसे धरणि होउनि आकुला ॥

४० वसंततिलका. पा०

जाणा वसंततिलका ह्मणतें चवृत्त ॥
येती जिथें तभजजागग हे सुवृत्त ॥
संख्या चतुर्दशपदांतिल अक्षरांची ॥
होतेजनांत अपकीर्ति निरक्षरांची ॥

चरणांत अक्षरें १४ गण. त. भ. ज. ज. ग. ग.

उदाहरण. दु० चाकुंतलना०

घोडे कधीं नरवळती रविच्या रथाचे ॥
उल्लंघितीपवनभाग सदा नभाचे ॥
भूभार शेष धरि संतत मस्तकांहीं ॥
राजास विश्रम तसा क्षण मात्र नाहीं ॥

४१ प्रहरणकलिता. ७, ७

प्रहरण कलिता कवि ह्मणति तिला ॥
नन भन लग हे गण असति जिला ॥
अवयव चवदा प्रतिपदिं भरले ॥
गुरु पद धरितां जन बहु तरले ॥

चरणांत अक्षरें. १४ गण. न. न. भ. न. ल. ग.

उदाहरण. वा० राम० जो०

निशिदिनिं रिपुचें भयजरि तुजला ॥
अठिव सतत तूं विषधर स तिला ॥
अवन करिल ती जननि तशि सदा ॥
स जिल न महिषासुर मथनि कदा ॥

१ या वृत्ताला सिंहोद्धता आणि उद्धर्षिणी मधुमाधवी अशीं [illegible] आहेत

४२ असंबाधा. य० ५,९

त्या वृत्ताला बोलति सुकवि असंबाधा ॥
ज्या ज्यापादीं येमतन सगग निर्बाधा ॥
एके पादीं अक्षरभर तिळतीं चौदा ॥
पुण्याचा तूं ठोकर करिं मनुजा सौदा ॥

चरणांत अक्षरें १४ गण. म · त · न · स · ग · ग·

उदाहरण. बा० राम० जो०

मोठे दाते ते तनुधन सह गेले कीं ॥
स्वर्गी त्यांचे भूवरि कतनु रले केकीं ॥
गोळी यांतें तो यदुपति दिसतो साधा ॥
भक्तांचीजो दूर सहज करितो बाधा ॥

४३ मध्यक्षामा.

मध्यक्षामा सुकवि म्हणति त्यावृत्ताला।
पादींपादीं मभनय गग येती ज्याला ॥
एकेपादीं अवयव चवदा ह्या येती ॥
दाते तेजे तनुधन गरिबाला देती ॥

चरणांत अक्षरें १४ गण· म · भ · न · य · ग · ग·

उदाहरण. दु० स्वकृत.

नंदा ज्ञेनें कटिवरि हरि घेई राधा ॥
गेहा जातां मनसिज बहु देई बाधा ॥
कुंजारण्या प्रति हरि सह राधा गेली ॥
तेथें त्यांनीं बहुविध चिर केली केली ॥

## ४४ मालिनी. य० ८, ७

म्हणति कवि न याला मालिनी वृत्त ते व्हां ॥
नन म यय असे हे संघ येतात जे व्हां ॥
प्रति चरणिं हि पंध्रा अक्षरें ही नयाचीं ॥
हरि हर चरणांला आपुलें ही नयाचीं ॥

चरणांत अक्षरें १५ गण. न. न. म. स. य.

### उदाहरण. दु० शाकुं० ना०

तरु वर सुफलांच्या आगमीं नम्र होती ॥
जलद हि जल भारें खालती फार येती ॥
सुपुरुष विनयातें भाग्य काळीं धरीती ॥
उपकृति करि त्यांची जाणि जे हीचरीती ॥

## ४५ चामर. पा०

चाम राख्य वृत्ततें च बोलती कवी सदा ॥
जेथ राजराजरा असेच लागती पदा ॥
योजितां पदांत होति अक्षरें हि पंधरा ॥
पाद तांचि सज्जनास वांकवाचि कंधरा ॥

चरणांत अक्षरें १५ गण. र. ज. र. ज. र.

### उदाहरण. बा० राम० जो०

राधिका पहावयास जातसे रमापती ॥
प्राकृता समान त्यास वृद्ध गोप कोपती ॥
तो कळे न हा हरीच गोकुळांत पामरा ॥
नीच मार्जनी समान मानिता त चामरा ॥

## ४६ पंचचामर. पा०

तयास पंचचामरारव्य वृत्त बोलती सदा ॥
लघू गुरू अशीं युगेंच आठ ज्यांचिया पदा ॥
दहा सहा पहा गणून अक्षरें पदांत या ॥
जयांचिया मनासि शांति सौख्य सर्वदा तया ॥

चरणांत अक्षरें १६ गण. लघु गुरू अशीं आठ युग्में.

### उदाहरण. बा० वेणीसं० ना०

अजून केशनूमचे विमुक्त नादिं जाहले ॥
कशी करील बुद्ध ही अधीच बाइ आपले ॥
अशा मदीय उत्तरें मनांत फार खोंचली ॥
जणूं गमेति लाउरीं सुरीच काय बोचली ॥

## ४७ शिखरिणी. य० ७, ११

तया वृत्ता देती विबुधजन संज्ञा शिखरिणी ॥
जयामध्यें येती यमनसभलागा गण गणीं ॥
दहा आणी सात प्रतिचरणिं ही अक्षरमिती ॥
विसा वाले घ्यावा गुरु चरणिं सांगूं तुज किती ॥

चरणांत अक्षरें १७ गण. य. म. न. स. भ. ल. ग.

### उदाहरण. बा० रघुनाथ पं०

कदा नेणों ओढी शरधिं तुनि काढी शरकरा ॥
कदा धन्वीं जोडी वरिवरि दि सोडी तरि कदा ॥
विपक्षाच्या लक्षावरि विवर लक्षास्तव रणीं ॥
कळे राजेंद्राची त्वरित शर संधान करणी ॥

## ४८ पृथ्वी. य० ८, ९

सुवृत्त वडु चांगलें म्हणति सुज्ञ पृथ्वी तया ॥
अर्धी जसज त्यापुढें सयलगाहि येती जया ॥
पदांत सतरा पद्य असति अक्षरें मोजुनी ॥
पदाग्रारण येतिते लरति कीर्ति ऐशी जुनी ॥

चरणांत अक्षरें १७ गण. ज-स-ज-स-य-ल-ग.

### उदाहरण. बा० मोरोपं०

प्रसाद तुमचा कळा निधि कुमी गुणें आगळा ॥
हरी नत मनो मळा निज सुरद्रुमा चा भळा ॥
करी रत सदा बळानुज पदीं मना चंचळा ॥
सुखें चि धुरवील कासुचिर कीर्ति देउ ज्वळा ॥

## ४९ हरिणी. य० ६, ४, ७

म्हणति हरिणी त्या वृत्ताला परंतु जशी रुरू ॥
नसमरस हे आधीं येती पुढें च लघू गुरू ॥
प्रतिचरणिं ही येती सत्रा समान चि अक्षरें ॥
शरण गुरुच्या पायां जावें करील चि तो बरें ॥

चरणांत अक्षरें १७ गण न-स-म-र-स-ल-ग.

### उदाहरण. बा० मोरोपं०

अभय दिधलें आहे वादे शानि मतिभास्वरा ॥
विधुमणि चिया सारा तारा पकारण पास्वरा ॥
जडहि कविता जोडी गोडी गुणीं हरिच्या धरी ॥
सहज तुमचा होनादी नाप्रसाद ससुन्दरी ॥

## ५० मंदाक्रांता. य० ४, ६, ७,

मंदाक्रांता म्हणति तिजला वृत्त तें मंद चाले ॥
ज्याच्या पादीं म भ न त त हे आणि गा दोन आले ॥
एक्या पादीं गणति सतरा अक्षरांचीच होते ॥
काढीं रामा भवनदिंतुनी खानसें फारगोते ॥

चरणांत अक्षरें १७ गण. म. भ. न. त. त. ग. ग.

### उदाहरण. बा० उत्तररामच० ना०

हा हा देवी हृदय फुटतें देह माझा गळाला ॥
वाटे शून्य त्रिभुवन मला अंतरात्मा जळाला ॥
या आत्म्यानें किति तरि सदा दुःख भारा धरावें ॥
मोहव्यापी फिरफिरुनि म्यां काय आतां करावें ॥

## ५१ विबुधप्रिया. ३, ५, ५, ५,

होतसे विबुधप्रियाह्वय वृत्त तें बरवें तिथे ॥
रासजा ज भ रा असे गण येति सा सरसे जिथे ॥
अक्षरें अठराच येतिल पादिं मोजुनियां पहा ॥
दीनतारक दुःख हारक शत्रुमारक राम हा ॥

चरणांत अक्षरें १८ गण. र. स. ज. ज. भ. र.

### उदाहरण. बा० रामचं० जो०

राधिका सखि आजती मज आणिं भेटिस राजसे ॥
देतसें धन फारसें नवमानसा अवडे तसें ॥ ॥
चित्त हें निज पाहुनी भ्रमलें हुजी न करूं चेकिपा ॥
प्राण जाइल वाटतो जरि येइना विबुधप्रिया ॥

५२ शार्दूलविक्रीडित. य० १२, ७,

त्याचें वृत्त विशाल त्यास म्हणती शार्दूलविक्रीडित ॥
मासाजा सतता गयेति गणहे पादास कीं जोडित ॥
एकोणीस पहा गणूनि चरणीं येतात हीं अक्षरें ॥
तेजःपुंज नभोंगणीं पसरलीं रत्नें पहा नेसरें ॥

चरणांत अक्षरें १९ गण. म. स. ज. स. न. त. ग.

उदाहरण. बा० मोरोपं०

जो लोकत्रितयीं फिरे स्थिर नसे तादीं जसा पारद ॥
स्वांत ध्येय पदींच निश्चल भवांभोधींत जो पारद ॥
जो वर्णे गगनोदरीं क्षण दिसे पूर्णेंदु कीं शारद ॥
श्रीशांतःपुरत्व तरीच उतरे तो सन्मुनी नारद ॥

५३ स्रग्धरा. य० ७, ७, ७,

कंठीं माळा धरीजी सुरुचिरतिजला स्रग्धरा नाम देती ॥
सावृत्तीं एक पादीं मरभस ययया हे गण स्पष्ट येती ॥
ज्याच्या प्रत्येक पादीं भरति लगणितां अक्षरें येकवीस ॥
श्रीरामाचें सुभद्र स्मरण मग कसें होइनातें कवीस ॥

चरणांत अक्षरें २१ गण. म. र. भ. न. य. य. य.

उदाहरण. बा० मोरोपं०

माझा प्रेमा सुदामा हरि सखदुबळा शब्दसंदोह जो हे ॥
साधूपात्रीं श्रुतीनें पदरपसरुनी जोडिले स्वल्प जो हे ॥
या दीनोपायनातें बुधजन भगवान् प्रीतिनें फार गोडी ॥
आणोनिश्रो तृवर्गीं भरिल बहु दया मानुनी तें हि थोडी ॥

---

१ नक्षत्रें

## ५४ अमृत ध्वनि. ४,७,७,४

साराऽमृत ध्वनि उदारा नरा सुख विदारा तिलाच म्हणती ॥
ताभाय जा सरनगा हे चजेथ गण एकैक पादिं गणती ॥
बेवीस येति चरणीं अक्षरें गणुनि पाहींच संशय जरी ॥
रक्षावया परम भक्तास संकटिंच देत्याव धी नर हरी ॥

चरणांत अक्षरें २२ गण. त. भ. य. ज. स. र. न. ग.

### उदाहरण. बा॰ आनंद तनय.

माला करीं हृदय भालासितें भसित ज्वाला मृगाजिन कटी ॥
लोला जटा रुळति दोलापरी परम कोला हल ध्वनि उठी ॥
हालाभ मानुनिच नीला लका सुकृत शीला तयास नमिती ॥
आला मुनी निज घराला म्हणूनि मग झाला पुढें नरपती ॥

## ५५ मंदार माला. ४,६,६,६,

मंदार माला कवी बोलती हीस कोणी हि लाअश्व धाटी असें ॥
सप्तात कारीं जिथें हा घडे पाद तेथें गुरू एक अंतीं वसे ॥
या मोजितां एकपादांत निभ्रांत ये तील बेवीस कीं अक्षरें ॥
वाराभया ताप ताराभया यास नारायणा तूंचि येस त्वरें ॥

चरणांत अक्षरें २२ गण. त. त. त. त. त. त. त. ग.

### उदाहरण. बा॰ मोरोपंत.

पाचाळ मी नीट पाचारितों धीट याचा नपो वीट साचा हरी ॥
खोटा जरी मीच खोटा मधें तूंचि मोठा कृपेचा नतोटा घरीं ॥
दाता सुखाचा सदा तारिता आप दाता पहे एक दाता पदीं ॥
या संत सेवा व्हया संपदा दे भया संग नाशील या संकटीं ॥

## ५६ उमा. ६, ६, ६, ४

तीस उमा कवि बोलति जीस कुं आवडती गिरिशास सती ॥
सत्पदिं सात भ नामक हे गण शेवटिं एक गुरू असती ॥
बाविस अक्षर हाविसदा पदकाप्रति राहिल नेम चिया ॥
मीनजळाविण दीन तसा हरि हीन कृपे विण मी तुझिया ॥

चरणांत अक्षरें २२ गण. भ. भ. भ. भ. भ. भ. भ. ग.

### उदाहरण. वा॰ आनंदतनय.

यापरिचे भव ताप विमोचन चापशरां कित भव्यमती ॥
पाकुनि सर्व नृपा कुनि उत्तम लाकुनि तोषपुसे नृपती ॥
कोण असे महिपाळक बाळक हे जग चाळक से कचले ॥
सांग मला सहसागम नाशय चांग मनांत मला रुचले ॥

## ५७ मदिरा. ६, ६, ६, ५.

ती मदिरा कवि बोलति जी मन मोकुनियां जन लाविल नादीं ॥
ज्या गण सात भ नामक आधिंच दोन गुरू मग येतिल पादीं ॥
अक्षर संमिति पाहसि तूं जरि ते विस होतिल नेम चियाचा ॥
साधुनि सत्वर घ्या स्वहिता तुम्हि कांहिंच नेम नसे स्ववयाचा ॥

चरणांत अक्षरें २३ गण. भ. भ. भ. भ. भ. भ. भ. ग. ग.

### उदाहरण. दु॰ स्वकृत.

पाकुनि दीन जनांस जळाविण मीन तसा अति दुःखित होतो ॥
कष्टवुनी निजदेह जनाबकु तुष्टवि नित्य चि साधु अहो तो ॥
जो उपकार करी सुजना वरि अंतरिं निर्मळ भाव धरी तो ॥
साधितसे परकीय हिता परि साधन आत्महितींच करितो ॥

५८ मदिरा किंवा सवाई. ६,६६,५.

ठेविति नाम तया मदिरेस्वि थोरथोर कविराज सवाई ॥
च्यार भकार पुढें रनभा गग जेथ जेथ गण येतिल पाईं ॥
यां नहि तेविस अक्षरसंमित पादिं पादिं सम मोजुनि घेईं ॥
सज्जनसंगतिरें नर ओडुनि दुर्जन संगति सोडुनि देईं ॥
चरणांत अक्षरें २३ गण. भ. भ. भ. भ. र. न. भ. ग. ग.

उदाहरण. वा० मोरोपं०

राम रघूत्तम कामरिपुप्रिय लोकशोक हरया परिभावें ॥
दाशरथे तुज होउनियां पदिं लीनदीनजन बंधुसि गावें ॥
आमरणस्मृति हेच असो वय याच साच सुपथांत सरावें ॥
देवर दावर या शरणाप्रति पापताप जलधीस तरावें ॥

५९ दुसरी सवाई. ७,६६,४,

कविजन त्या मदिरेस म्हणुनि ठेविति नाम सवाई तिला ॥
प्रथम नकार अकार सहा मग शेवटिं ते लग येति जिला ॥
भरतिल तेविस अक्षर एक पदीं जरि मोजुनि पाहसि तीं ॥
प्रतिदिन वाढतसे हि उणावतसे विधु पक्षिं सितीं असितीं ॥
चरणांत अक्षरें २३ गण. न. भ. भ. भ. भ. भ. भ. ल. ग.

उदाहरण. वा० मोरोपं०

शिवहृदयालय कीं सुखदायक निर्जरनायक सेव्य पदा ॥
अभय मला जरि देसि अपाय निवारुनि पाय नमीन सदा ॥
तुज भुजगाभ भुजासि असे वर मागतसें वरदान करा ॥
रघुकुलवंशवतंस दशानन संतति कानन दाह करा ॥

# अर्धसमवृत्तें.

## हरिणीप्लुता.

विषमीं त्रिसकार लगा असे॥ नभभर क्रम हाच समींवसे॥
विषमीं अकराचरणीं युता॥ द्विदश अक्षरती हरिणीप्लुता॥
चरण १-३ अक्षरें ११ गण. स-स-स ल-ग-च-२-४ अ०१२ गण. न.भ. भ.र.

### उदाहरण. वा० नवनी०

मजला गिरिराज कन्यीवया॥ वनलतांत नकींलपवीप्रिया॥
कृश अंग तिचें अतिनिर्मळ॥ प्रिय निरंतर भाषणकोमळ॥

## माल्यभारा.

विषमींच पदीं ससा जगागा॥ समपादा सभरायये तिभागा॥
विषमीं अकरा समींच बारा॥ तरिसंज्ञा तिसहोय माल्यभारा॥
च० १-३ अ० ११ गण. स स जगग. च० २-४ अ० १२ ग० स भ र य.

### उदाहरण. वा० प्रसन्नराघव.

निजकाव्यरसेंच तृप्त होती॥ पण काव्यें परकीय साधु गाती॥
निजपुष्परसें अळे बुडाले॥ पण तो कुंभजकेंच आम्र डोले॥

## पुष्पिताग्रा.

विषमिंच चरणीं ननारयाह्य॥ नजजरगा क्रमहा समांतपाह्य॥
द्विदश विषमिं अक्षरें समग्रा॥ त्रिदश समीं पदिंतीच पुष्पिताग्रा॥
च० १-३ अ० १२ ग० न न र य. च० २-४ अ० १२ ग० न ज ज. र. ग.

### उदाहरण. वा० रामचं० जो०

नृपजननगरींत सोयपाह्य॥ नृपभजना सजुनी घरींनराह्य॥
नगरिहि भरली दिसे समग्रा॥ ध्वजशिखरींलतिकाच पुष्पिताग्रा॥

## मात्रा गण वृत्तें.

### आर्या वृत्तें.

आर्येच्या प्रत्येक अर्धांत साडेसात मात्रा गण असावे. त्यांत विषम स्थानीं जगण नसावा आणि षष्ठ स्थानीं जगण किंवा नगण यावा हा सामान्य नियम आहे.

#### आर्यांचे भेद.

आर्या गीत्युपगीत्युद्गीत्यार्यागीति हे असे पांच ॥
आर्यांचे भेद पहा छंदःशास्त्रांत वर्णिले साच ॥

आर्या, गीति, उपगीति, उद्गीति, आर्यागीति, असे पांच भेद.

#### १ आर्या लक्षण.

आर्येच्या प्रथमपदीं द्वादशमात्रा तशाच तिसऱ्याही ॥
अष्टादश दुसऱ्याला आणिक चवथ्यास पंचदश ॥

उदाहरण. बाहेरचें.

नूतन पल्लव फुटला असला तरु आणिला प्रियेनें तो ॥
लवकर चारवयाला तोंडावीं गज पहा नेतो ॥

#### २ गीति लक्षण.

गीतीच्या प्रथमपदीं, द्वादश मात्रा तशाच तिसऱ्याला ॥
दुसऱ्या पादीं अठरा, मात्रा असती तशाच चवथ्याला ॥

उदाहरण. बा० मोरोपं०

तरला ययाति राजा, दर्शन होतांच संत रायाचें ॥
सद्दर्शनचि सुदर्शन, करि गद चट कटक अंतरायाचें ॥

—

३ उपगीति लक्षण.

उपगीतीच्या पहिल्या तिसऱ्याही द्वादशचि मात्रा॥
दुसऱ्या आणिक चवथ्या, मात्रा पादांत पंधराची

उदाहरण. वाहेर.

यलें श्रेयक काया, शास्त्रानुभव हित सा भावें॥
सद्गुरुला शरण कपट, दंभहि टाकूनियां जावें॥

४ उद्गीति लक्षण.

उद्गीतीच्या पहिल्या, तिसऱ्याही द्वादशचि मात्रा॥
दुसऱ्या पादीं पंधा, चवथ्या पादांत येति अष्टदश॥

उदाहरण. स्वकृ.

देवा मी शरण तुला, आलों मज तूंचि सांभाळीं॥
तूंचि समर्थ पुसाया, दुर्लिपि माझ्या असेल जी भाळीं॥

५ आर्यागीति लक्षण.

पहिल्या चरणीं बारा॥ मात्रा दुसऱ्यांत सात आणी तेरा॥
उभयदळीं हे रीती॥ जीस तिला म्हणति सुज्ञ आर्यागीती॥

उदाहरण. बा॰ मोरो.

मी प्रिय करिन सकळवा॥ आहे कीं व्रज अहो असाध्व सकळवा॥
निवसा घरिं घोरांनीं॥ रात्रिं फिरावें शिवें छुनरि घोरानीं॥

आर्येचे पथ्या चपला विपुला इत्यादि अवांतर भेद पुष्कळ आहेत ते येथें लिहिले नाहींत.

समाप्त.

## परिशेष.

केवळ प्राकृत कवितेंत मात्र येणारीं अशीं कांहीं छंदें आहेत त्यांतून प्रसिद्ध तीं प्रसंगवशात् येथें सांगतों. तीं हीं, अभंग, दिंडी, साकी, ओंवी, आणि घनाक्षरी.

### १ अभंग छंद.

अभंग मुख्यत्वें दोन प्रकारचे आहेत. एक मोठा अभंग आणि एक लहान अभंग. त्यांत मोठ्या अभंगाचे दोन प्रकार आणि लहान अभंगाचे तीन प्रकार असे सर्व मिळून पांच प्रकार आहेत. ते क्रमानें सांगतों.

### मोठा अभंग.

मोठ्या अभंगास चार चरण असतात. त्यांत पहिल्या तीन चरणांस प्रत्येकीं सहा सहा अक्षरें आणि चवथ्या चरणास चार अक्षरें असतात.

### पहिला प्रकार.

दुसऱ्या आणि तिसऱ्या चरणाच्या शेवटीं यमक.

उदाहरण. अभंग तुकारामाचे.

काय वाणूं आतां। नपुरे ही वाणी॥ मस्तक चरणीं॥ ठेवीयला॥ १॥
थोरींव सांडिली॥ आपुली परिसें॥ धन्य केलें कैसें॥ लोखंडासी॥ २॥
जगाच्या कल्याणा॥ संताच्या विभूती॥ देह कष्टविती॥ उपकारें॥ ३॥
भूतांची दया हे॥ भांडवल संतां॥ आपुल्या ममता॥ देहीं नाहीं॥ ४॥
तुका म्हणे सुख॥ पराचिया सुखें॥ अमृत हें मुखें॥ स्रवतसे॥ ५॥

## दुसरा प्रकार.

पहिल्या, दुसऱ्या, आणि तिसऱ्या चरणास यमक अ०

### उदाहरण. अभंग तुकारा०

पंढरीस जावें ॥ जीवन्मुक्त व्हावें ॥ केशवा भेटावें ॥ जीविलगा ॥ १ ॥
जन हे सुखाचे ॥ दिल्या घेतल्याचे ॥ बा अंतकाळींचे ॥ नाहीं कोणी ॥ २ ॥

## लहान अभंग.

लहान अभंगास दोन चरण असतात. प्रत्येक चरणांस आठ आठ अक्षरें असतात. क्वचित् पहिल्या चरणास सहा अक्षरें असतात. दोन्ही चरणास यमक असतें.

### उदाहरण. अभंग तुकारा०

जरी व्हावा तूज देव ॥ तरी सुलभ उपाव ॥ १ ॥
करीं मस्तक ठेंगणा ॥ लागें संतांच्या चरणा ॥ २ ॥
भावें गावें गीत ॥ शुद्ध करोनीयां चित्त ॥ ३ ॥
तुका म्हणे फार ॥ थोडा करीं उपकार ॥ ४ ॥

## याचा दुसरा प्रकार.

दुसऱ्या चरणाचीं सात अक्षरें असून चवथें यमकाक्षर.

### उदाहरण. अभंग तुकारा०

पुढें आतां कैंचा जन्म ॥ ऐसा श्रम वारेसा ॥ १ ॥
पांडुरंग ऐशी नाव ॥ तारी भाव असतां ॥ २ ॥

## याचा तिसरा प्रकार.

याला आठ आठ अक्षरांचे चार चरण असतात, आणि पहिल्या तीन चरणांच्या शेवटीं यमक असतें.

उदाहरण. अभंग तुकाराम.

देवा पायीं नाहीं भाव ॥ भक्ति वरी वरी वाव ॥
समर्पिला नाहीं जीव ॥ जाणावा हा व्यभिचार ॥ १ ॥

---

## २ दिंडी छंद.

दिंडीला चार चरण असतात. आणि शेवटीं यमक असतें. त्यांत कोठें दोन दोन चरणांचीं सारखीं, कोठें चारी चरणांचीं सारखीं यमकें असतात. या छंदास अक्षरांचा नियम नाहीं पण मात्रांचा नियम आहे. प्रत्येक चरणास १९ एकोणीस मात्रा असतात, आणि नवव्या मात्रेवर अवसान असतें. म्हणून ९ मात्रांचा एक व १० मात्रांचा एक असे दोन दोन भाग होतात. त्यांच्या मात्रांची रचना अशी असावी. कीं, पहिल्या भागांत प्रथम तीन मात्रांचा एक गण, म्हणजे एक गुरु, एक लघु, किंवा एक लघु, एक गुरु, किंवा तीन्ही लघु, असा असावा. त्यापुढें तीन गुरु, किंवा सहा लघु, किंवा लघु गुरु मिळून सहा मात्रांचा गण असावा. दुसऱ्या भागांत पहिल्या प्रमाणें प्रथम तीन मात्रांचा गण, मग पुन्हा तसाच आणखी तीन मात्रांचा गण, त्यांच्या पुढें म्हणजे शेवटीं दोन गुरु असावे.

१ उदाहरण. दिंडी. रघुनाथ पंडित.

कथा बोलूं हे, मधुर सुधा धारा ॥ होय शृंगारा, करुण रसा धारा ॥ १ ॥
निषधराजा नळ, नामधेय होता ॥ वीरसेनाचा तनय महा होता ॥ २ ॥

## २ उदाहरण. दिंडी. रघु० पं०

यो गुणीनें जरि पूर्ण शीत भानू ॥ नव्हा ऐसा तरि कळा निधी मानू ॥
प्रतापाचा जो नमाळ वे भानू ॥ तया सारिखा कोण दुजा वानू ॥ १ ॥

---

## ३ साकी छंद.

प्रत्येक साकीला दोन चरण किंवा दोन अर्धे असतात. आणि दोहोंच्या शेवटीं यमक असतें. प्रत्येक अर्धांत चार मात्रांचा एक गण असे सात गण म्हणजे २८ अठ्ठावीस मात्रा असतात. चवथ्या गणाच्या अंतीं म्हणजे सोळाव्या मात्रेवर अवसान असतें. पूर्वीं मात्रा वृत्तांत मात्रा गण पांच प्रकारचे सांगितले आहेत. त्यां तून कोणते ही गण असले तरी चिंता नाहीं, पण गण निरनिराळे मोजतां येतील असें असावे. आणि शेवटीं गुरु अक्षर यावें.

### उदाहरण. साक्या. मोरोपंत.

श्री रघुवंशी ब्रम्ह प्रार्थित, लक्ष्मीपति अवतरला ॥
विश्व सहित ज्याच्या जनकत्वें, कौसल्या धव तरला ॥ १ ॥
राखविसिद्धिसि आश्रमिं जो नेतो, गाधिज मागुनि नेला ॥
शिकवि बलाति बला विद्या शत, अस्त्रें विधिच्याने ला ॥ २ ॥
जनक मखातें मुनिसह जातां, प्रभुनें गौतम भार्या ॥
उद्धरिली ती पति सह पूजी, स्तवुनि अहल्या आर्या ॥ ३ ॥
यश करि भारी भव धनु भंगुनि, हर्षे सीता बाळा ॥
माळा घालुनि वरती झाली, रामा त्रिजगत्पाळा ॥ ४ ॥

## ५ ओंवी छंद.

ओंवीला चार चरण असतात. तीन चरणांच्या शेवटीं यमक असतें. चवथ्याला नसतें. पहिल्या तीन चरणांस आठ आठ अक्षरें आणि शेवटच्या चरणास सात अक्षरें असावीं. हा मुख्य नियम. परंतु शब्द अर्थ ह्यांच्या अनुरोधानें कवि उणीं अधिक अक्षरें घालतात.

### उदाहरण. ओंवी ज्ञानदेव.

जो सर्वां भूतांचे ठायीं ॥ द्वेषातें नेणेचि कांहीं ॥
आप पर जया नाहीं ॥ चैतन्य पैं जैसें ॥ १ ॥

### उदाहरण. ओं॰ मुक्तेश्वर.

पौरव वंशीं प्रख्यात कीर्ती ॥ दुष्यंत नामा गुणैकमूर्ती ॥
श्रेष्ठ भूपाल चक्रवर्ती ॥ वीर्यें शौर्यें आगळा ॥ १ ॥

### उदाहरण. ओं॰ एकनाथ.

मस्तकींचे नीळ कुंतळ ॥ जैंवि नभ अति सुनीळ ॥
तळीं मुखचंद्र निर्मळ ॥ भीमकी चा उगवला ॥ १ ॥

### उदाहरण. ओं॰ श्रीधर.

यशोदा म्हणे हे जगजेठी ॥ आतां कैंची तुझी भेटी ॥
स्नेह उमाळे उठती पोटीं ॥ स्तनीं पान्हा फुटलासे ॥ १ ॥

### उदाहरण. ओं॰ रामदास.

आतां वंदूं कवीश्वर ॥ जे शब्द सृष्टीचे ईश्वर ॥
नाहींतरी हे परमेश्वर ॥ वेदावतार ॥ १ ॥ ॥

## ५ घनाक्षरी छंद.

घनाक्षरी छंद ओंव्याप्रमाणें आहे. पण तशा चार मिळून एक घनाक्षरी होते. घनाक्षरीला सोळा चरण येतात. चार चरण मिळून तिचा एक पाद होतो. प्रत्येक पादाच्या पोटचे चार चरण, त्यांत पहिल्या तीन चरणास प्रत्येकीं आठ अक्षरें असून १२ मात्रा असाव्या. आणि चवथ्या चरणांस सात अक्षरें असून ११ मात्रा असाव्या असा प्रायः नियम असतो. प्रत्येक पादांत तीन तीन चरणांचीं यमकें आणि प्रत्येक पादाच्या चवथ्या चवथ्या चरणांचीं यमकें असावीं. यास उदाहरणें.

### उ० घनाक्षरी वामनाची.

अहो केकेयी हें काय॥ केलें तुवां हाय हाय॥
न म्हणवे तुज माय॥ जन्मोजन्मीं वैरिणी॥१॥
सर्व जगदभि राम॥ वना धाडिला तो राम॥
केलें विख्यात कुनाम॥ कीं हे पति मारिणी॥२॥
तुझ्या वधेन अधर्म॥ तुज मारावें हा धर्म॥
परि निंदील हें कर्म॥ राम पाप कारिणी॥३॥
नाहींतरी प्राण आज्य॥ तुझे घालोनियां प्राज्य॥
आणोनियां सामराज्य॥ दाखवितो करणी॥४॥

### उदाहरण. दु० घनाक्षरी वामनाची.

म्हणे भरत हा राम॥ आहे आहे मेघश्याम॥
वसिष्ठ हा गुरु नाम॥ तोही मज कोपला॥१॥

अंतरले तुझे पाय ॥ तया राज्याचे उपाय ॥
सांगे मज हाय हाय ॥ नव्हे गुरु आपला ॥२॥
अग्नि तुल्य वाटे राज्य ॥ मज जाळील सामराज्य ॥
वरी ऋषी घाली आज्य ॥ त्यानें जीव तापला ॥३॥
दावी सत्वर चरण ॥ किंवा स्वामी दे मरण ॥
तुझ्या नामाचें स्मरण ॥ त्याचा भव संपला ॥४॥

उदाहरण. घना० मोरोपंत.

विश्वामित्र तपोधन ॥ त्याचें तोष वाया मन ॥
तृषितें तृषिता वन ॥ पीतां धावें ज्यापरी ॥१॥
गुरुक्तें दशास्यंदन ॥ राम लक्ष्मण नंदन ॥
अर्पी करूनी वंदन ॥ चित्तीं म्हणे हा परी ॥२॥
बलातिबला रव्यादोन ॥ विद्या देगुण वदोन ॥
प्रवास राज्य पदोन ॥ नवाटे त्या उपरी ॥३॥
प्रेमें अस्त्र शत दान ॥ दे रामास बहुमान ॥
गाधिज सत्कथापान ॥ करवी परोपरी ॥४॥

उदाहरण. घना० मोरोपं०

मुनी गुरू म्हणे हाण ॥ तोंची सोडोनी सुबाण ॥
ताटकेचे हरी प्राण ॥ राम लावी न क्षण ॥१॥
सिद्धाश्रमीं निशाचर ॥ सुबाहु प्रमुख खर ॥
संहारी हाणोनी शर ॥ करी यज्ञ रक्षण ॥२॥
पुंखवातें महाशूर ॥ मारीचा उडवी दूर ॥
दैवें नाहीं झाला चूर ॥ तो कीं तें विलक्षण ॥३॥

विश्वा मित्र सभाजन॥ करी स्तुती सभाजन॥
सर्व ऋषी सभा जन॥ झाले तेव्हां स क्षण॥ ४॥

यां शिवाय प्राकृत कवितेंत अनेक प्रकारच्या च लीचीं पदें, कटिबंध, चूर्णिका, इत्यादि प्रकार आहेत ते सांगण्याची येथें आवश्यकता नाहीं म्हणून सांगितले नाहींत. सवाई म्हणून जो प्रकार आहे तो वृत्तांत धरण्या सारखा आहे म्हणून तो वर सांगितला आहे.

## उपसंहार.

हें वृत्त दर्पण असुज्ञजनार्थ केलें॥ सुज्ञा समोर जरि धैर्य धरोनि नेलें॥
ऐकोन हांसति ल रीति नवीन कानें॥ हातीं तथापि धरितील चि कौतुकानें॥ १
येथें जें पडलें उणें अधिकतें विद्वज्जनीं साहिजे॥
प्रेमें पूर्ण कृपा करोनि बरवें केलें तिहीं पाहिजे॥ २॥
जेजे थोर परोपकार रतत्यां हें योग्य आहे सदा॥
त्यांचा तो उपकार फारच अम्ही मानूं सदा सर्वदा॥ ३॥
धुंडोनि यां वृत्त सुधाकरातें॥ जे लागले वृत्तमणी करातें॥
करोनि त्यांचीच सुवृत्त माला॥ समर्पिली म्यां विबुधोत्तमाला॥ ४
हा ग्रंथ गोडबोले उपनामक परशुराम तात्यानें॥
केला वाचायाला ज्याच्या हृदयांत रसिक तात्यानें॥ ५॥
सत्राशें व्यांयशींच्या हा संपला रौद्र वत्सरीं॥
श्रावणाच्या कृष्ण पक्षीं दशमी भानुवासरीं॥ ६॥

**वृत्त दर्पण समाप्त.**

# शुद्धिपत्र

| ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
| --- | --- | --- |
| ७ | संग | संघ |
| १२ | स्पष्टा | स्पष्ट |
| २१ | कुंज्या | कुंजा |
| १६ | वांकवावी | वांकवावि |
| १७ | भ-भ-भ-भ-भ-भ- | ज-ज-ज-ज-ज-ज- |
| १९ | च. २-४ अ. १२ | च. २-४ अ. १३ |
| १६ | तुस्यावधे | तुस्यावधें |